# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक ०३/१२/२०२३ (रविवार)

---

## जबरी चोरी

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी**:—अंतर्गत यातील फिर्यादी **हे** दि.०२/१२/२०२३ रोजी ०९.२५ वा.दर. आपले ज्वेलरी शॉप बंद करून दुकानातुन सोन्या चांदीचे दागीने व कॅश असलेली बॅग सोबत घेवुन कार ने घरी परत जात असतांना खापरी मोरेश्वर रोडवर समोरून एक स्कुटी चालक आला व त्यांनी **फिर्यादीच्या कारला धडक दिली व खाली पडला त्यांचे मदतीला फिर्यादी कार मधुन बाहेर आले असता, टाकळधाटच्या दिशेने एक स्कुटीस्वार आला व त्याने फिर्यादीच्या डोळ्यात मिर्ची पावडर टाकुन दोघांनी रोडच्या खाली धकलुन दिले व फिर्यादीच्या कारमध्ये ठेवलेल्या ज्वेलरीचे बॅग काढुन पळुन गेले ज्यात सोन्या चांदीचे व रोख रक्कम मिळुन एकुण २८,११,३२०/रू चा माल होता.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे—अतुल रामकृष्ण सेरेकर वय ३६ वर्ा रा. खापरी मोरेश्वर ता. हिंगणा जि. नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम **३९४,३४ भादवी**. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि/रॉय, मो. नं. ९९२३४ २४७६७ हे करीत आहे.

## विनयभंग करणा—या आरोपीवर कारवाई

**पोलीस स्टेशन खापरखेडा**:— **अंतर्गत** मौजा नगरधन,यातील फिर्यादी पिडीता व आरोपी नामे—बबन भगवानदास युवनाते वय २४ वर्ष राहणार चिंचोली बाबुळखेडा खापरखेडा यांच्यात पूर्वी प्रेम संबंध होते. फिर्यादी पिडीता हिने आरोपी सोबत संबंध तोडल्याने आरोपीने फिर्यादीस वारंवार फोन करून माझ्यासोबत बोल व मला भेटायला ये, असे बोलून दिनांक ०२.१२.२०२३ चे १७.३० ते १८.०० वा दरम्यान, पिडीताला भेटायला बोलवून तिचे सोबत लज्जास्पद बोलुन फिर्यादीची छेडछाड केली, तसेच फिर्यादीला म्हणाला की तू मला सोडून गेली तर तुला बर्बाद करून तुझा तमाशा करीन? अशी धमकी देऊन निघून गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी पिडीता हीचे रिपोर्टवरून पोस्टे खापरखेडा येथे आरोपी नामे—बबन भगवानदास युवनाते वय २४ वर्ष राहणार चिंचोली बाबुळखेडा खापरखेडा यांचे विरूध्द कलम ३५४(अ),३५४(ड), ५०६ भा. दं. विअन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मलकुवार मॅडम पो स्टे खापरखेडा मो नं ९६२३६८७६२७हे करीत आहे.

## सुगंधीत तंबाखु वाहुन नेणा—या आरोपीवर कारवाई

**पोलीस स्टेशन केळवदः— अंतर्गत** मौजा बिहाडा फाटा, यातील फिर्यादी हेपो स्टे परीसरात फिरत असताना गुप्त माहीतीगार कडून खात्रीशीर माहीती मिळाली की सूगंधित तंबाखू मध्यप्रदेश ते पाढूर्णा हायवे ने नागपूर कडे जाणारा असल्याची माहीती मिळाल्याने दिनांक ०१/१२/२३ चे १९/१८ ते २०/१० वा दरम्यान घटनास्थळावर सापळा रचून संपूर्ण माल १) ईगल हुक्का शिशा पांढ—या रंगाच्या २८ प्लास्टीक बो—या मध्ये ईगल हुका शिशा सुगंधीत तबाखुचे १२३२ पॉकेट प्रति पॅकेट २०० ग्रॅम प्रत्येकी किंमत—३१०/— रुपये प्रति पॅकेट असा एकुन किंमत ३,८१,९२०/—रुपये २) कार पांढ—या रंगाची वेरणा कार क. एम एच ३१ सी आर २६०३ किंमत ४,००,०००/—रुपये असा एकुन किंमत ७,८१,९२०/—मुद्येमाल आरोपी कडून जप्त करण्यात आला

. सदर प्रकरणी फिर्यादी सरतर्फे नामे—सहायक पोलीस निरीक्षक श्रीअमित पांडे नेमणूक पो स्टे रामटेक तात्पूरता संलग्न विशेष पोलीस पथक नागपूर ग्रा यांनी दिलेल्या रिपोर्टवरून पोस्टे केळवद येथे आरोपी नामे—रोहित राजू शिवनकर वय २४ वर्ष रातडोदी वार्ड क्र ०८ तह. नागबिळ जि. चद्रपूर यांचे विरूध्द कलम १८८, २७२, २७३, ३२८ भादवी अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि राकेश साखरकर पो स्टे केळवद मो क्र ७३५०९०२१०० हे करीत आहे.

## गळफास घेवुन आत्महत्या

**पोलीस स्टेशन कळमेश्वरः— अंतर्गत** मोहळी १२ कि. मि. पश्चिम,यातील फिर्यादी हा मजुरीचे काम करत असुन त्यांना दिपांशु वय १६ वर्ष मुलगा असुन मागील दोन तिन दिवसा पासुन फिर्यादीला मोठा एंड्राईड मोबाईल पाहिजे असे मुलगा जिद्द करत होता. परिस्थिती खराब असल्याने फिर्यादीने मोबाईल घेवुन दिला नाही.याकारणाचा मनात राग धरून दिपांशु याने दिनांक ०१.१२.२३ चे १७.३० ते २१.३० वा. दर. मौजा मोहळी शिवारातील भाऊरावजी चौधरी यांचे शेतातील घरामध्ये समोरचा खोलीत स्लॅपच्या लोखंडी कडीला दोरा बांधुन **गळफास घेवुन आत्महत्या** केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे—पुनाराम सेवकराम साहु वय ५७ वर्ष रा. थोटामल ता. सौंसर. जि. छिंदवाडा ह मु. कोहळी कळमेश्वरयेथे कलम १७४ जाफौ चा मर्ग दाखल करण्यात आला. सदर मर्गचा पुढील तपास मपोहवा/ ज्योति मो क्र ९५५२५५६३४१हे करीत आहे

**पोलीसउपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**